गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

| वर्ष २ रे | अंक ८६ वा | दिनांक : १३ ऑगस्ट २०२४ | वार : मंगळवार | पाने ४ | किंमत ४ रु/- |
|---|---|---|---|---|---|
| Volume 2 | Issue 86 | Date : 13/08/2024 | blow Tuesday | Page 4 | Price 4 |

# उत्तर भारतात पूर आणि भूस्खलनाचा कहर

## २८ जणांचा मृत्यू; दिल्लीमध्ये पावसाचा जोर वाढणार, हवामान विभागाचा इशारा



**दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली/वृत्तसंस्था : यंदाच्या मान्सूनमध्ये देशात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस कोसळत आहे. उत्तर भारतात अनेक राज्यांमध्ये उशिरा का होईना पण पावसाने हजेरी लावली आहे. अनेक ठिकाणी मुसळधार पावसाच्या कहराने जनजीवन विस्कळीत झाले आहे. काही ठिकाणी ढगफुटी झाल्याने मोठा पूर आला तर काही ठिकाणी भूस्खलन झाल्याचेही पाहायला मिळाले आहे. केरळच्या वायनाडमध्ये भूस्खलनामुळे ३०० हून अधिक जणांचा मृत्यू झाला. ही घटना ताजी असतानाच आता उत्तर भारतात विविध ठिकाणी झालेल्या मुसळधार पावसाने किमान २८ जणांचा बळी घेतला आहे. राजस्थानमध्ये जोरदार पावसामुळे भूस्खलन होऊन नागरिकांच्या घरांची पडझड झाली. दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन सध्या राज्यात गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

उत्तर भारतातील अनेक भागांमध्ये काल (११ ऑगस्ट) रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे झालेल्या विविध घटनांमध्ये २८ जणांचा मृत्यू झाला असल्याची माहिती आहे. मुख्यतः उत्तर आणि वायव्य भारतात हा मुसळधार पाऊस कोसळला. वादळी वाऱ्यासह कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे भूस्खलन झाले. त्यामुळे लोकांची । पान २ वर

## महाराष्ट्रात येत्या काही महिन्यांत आपलं सरकार.., सुप्रिया सुळेंचं वक्तव्य चर्चेत

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे : येत्या काही दिवसांमध्ये आपलं सरकार येणार असं वक्तव्य राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केलं आहे. लोकसभा निवडणुकीच्या काळात मी आणि अमोल कोल्हे चिंतेत होतो, पण तुमची ताकद होती त्यामुळे आम्ही निवडून आलो, असंही सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे. महाराष्ट्रात विधानसभा निवडणूक येऊ घातली आहे. त्यासाठी सगळ्याच पक्षांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. त्या पार्श्र्वभूमीवर सुप्रिया सुळेंनी केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे.आमदार, पदाधिकारी, कारखान्यातले पदाधिकारी, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगर पंचायती सगळे सोडून गेले. मी आणि अमोलदादा (अमोल कोल्हे) रोज विचार करायचो आता पुढे काय होणार? आम्हाला दोघांना तुमची ताकदच माहीत नव्हती. पक्षाची ताकद तुम्ही सगळे आहात. संघर्षाच्या काळात आम्ही काळजी करत होतो कारण पक्ष नव्हता, चिन्ह नव्हतं, नेते नव्हते काहीही नव्हतं. आम्ही दोघं एकमेकांना समजावत होतो. पण आता आम्हाला । पान २ वर



## पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवारांना सुवर्णपदक मिळेल; फडणवीसांची खोचक टीका!

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : देशात जर पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर त्याचे सुवर्णपदक शरद पवार यांना मिळेल, अशी खोचक टीका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. तसेच राज्यात महाविकास आघाडीबाबत कुठेही सहानुभूती नसून काही लोकांद्वारे केवळ सहानुभूतीचा डंका वाजवला जातो आहे, असे ते म्हणाले. देवेंद्र फडणवीस यांनी आज 'मुंबई तक' या वृत्तवाहिनीला मुलाखत दिली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर त्यांची भूमिका स्पष्ट केली. यावेळी त्यांना शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन पक्ष फुटण्याबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना त्यांनी शरद पवार यांच्यावर खोचक शब्दांत टीका केली.



मी पुन्हा आलो, पण यावेळी दोन पक्ष फोडून आलो, असं मी एकदाच बोललो होतो. आणि तेही गंमतीने बोललो होते. खरं तर अशाप्रकारे कोणीही कोणाचे पक्ष फोडू शकत नाही. दोन्ही पक्षा त्या त्या पक्षांतील नेत्यांमुळे फुटले. एकनाथ शिंदे यांना शिवसेनेत आणि अजित पवार यांना राष्ट्रवादीत त्यांचे भविष्य दिसत नसल्याने ते पक्षातून बाहेर पडले, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

पुढे बोलताना त्यांनी शरद पवार यांनाही लक्ष्य केलं. मुळात शरद पवार यांनी आतापर्यंत सगळ्यात जास्त पक्ष । पान २ वर

## १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी जाणार बेमुदत संपावर

**दैनिक यशसिध्दि न्यूज**

मुंबई : महाराष्ट्रातील तब्बल १७ लाख राज्य सरकारी कर्मचारी हे येत्या २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जाणार आहेत. मुबंईत पार पडलेल्या राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. राज्य सरकारी कर्मचारी संघटना कृती समितीचेमुख्य निमंत्रक विश्वास काटकर यांनी या संपाची माहिती दिली.

महाराष्ट्रातील १७ लाख सरकारी, निम सरकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी २९ ऑगस्टपासून बेमुदत संपावर जातील, असा निर्णय रविवारी मुंबई येथील समन्वय समितीच्या विस्तारीत । पान २ वर



## ✻ सुविचार ✻

सामर्थ्य हेच जीवन; दुर्बलता म्हणजे मृत्यू होय.
– स्वामी विवेकानंद

## संपादकीय

### कोण जबाबदार...

कोचिंग संस्थेच्या बेसमेंटमध्ये अचानक पाणी भरल्यामुळे 'आयएएस'ची तयारी करत असलेल्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. परवानगी न घेता बेसमेंटमध्ये अभ्यासिका चालवली जात होती, असे समोर आले. दुर्घटनेनंतर कायदा यंत्रणेच्या सगळ्या संस्था अचानक सक्रिय झालेल्या दिसल्या. आपल्याकडे बोट दाखवले जाईल अशी भीती असलेली प्रत्येक संस्था स्वत:च्या बचावाच्या कामालाही लागली व त्यात काही आश्चर्य नाही. कारवाईची मागणी करत विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू आहे. अशा प्रकारचे कोचिंग क्लास चालवणारे आणि सोशल मीडियावरील स्टार असलेले अन्य शिक्षकही आता सगळ्यांच्या नजरेला खुपू लागले आहेत. कोचिंग सेंटरच्या बेफिकिरीमुळे हे बळी गेले आहेत यात दुमत नाही. त्याचवेळी शिक्षण व्यवस्थेतील उदासीनतेचे आणि अनास्थेचे हे बळी नाहीत का, याचाही विचार आता अवश्य केला पाहिजे. देशात कोणतीही मोठी दुर्घटना घडली की लोक जागे होतात. आंदोलन किंवा निषेधाचे सूर उमटू लागतात. चौकशी समित्यांची नियुक्ती केली जाते. दोषींना कठोर शिक्षा केली जाईल, असे छापील वाक्य ठोकून सरकारही मोकळे होते. थोड्याच दिवसांत या सगळ्यावर पाणी पडते. त्यात मृत्युमुखी पडलेले आणि ती घटनाच नेमकी कशामुळे घडली यांनाही त्यांच्याच मरणाने मरणासाठी सोडून दिले जाते. लोकांचे जीवन तसेच पुढे सुरू राहते आणि चमकणारे चेहरे एक एक करत गायब होतात. हे सगळे झाल्यावर सगळे जण पुन्हा तेथेच येऊन थांबतात जेथे ते ती दुर्घटना घडण्याच्या अगोदर उभे होते. आज सामाजिक स्तरावर अनेक बदल झाले आहेत. अनेक सुविधा आणि संधी युवकांना खुणावत आहेत, तद्वतच विषमता हाही एक मुद्दा आहे. देशात बेरोजगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. प्रत्येकाला मोठे व्हायचे आहे, आकाशात भरारी घ्यायची आहे. सर्व प्रकारच्या माध्यमांमुळे आणि त्यातही शिक्षणाचा धंदा करणाऱ्यांनी केलेल्या बेसुमार जाहिरातींमुळे छोट्या छोट्या गावातील मुले मोठ्या शहरांची वाट धरत आहेत. ऐपत नसूनही आपल्या मुलाची वा मुलीची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आणि स्वत:चे उर्वरित आयुष्य तरी सुखकर होईल अशी अपेक्षा बाळगून पालक पोटाला चिमटा घेऊन मुलांना शहरात पाठवतात. मुलेही परिस्थितीची जाण असल्यामुळे आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून कठोर कष्ट घेतात. कारण त्यांना अपयशी होऊन चालणार नसते. मोठ्या शहरात ती जगतात कशी? देशातील विविध शहरे त्यांच्यासाठी सुरक्षित आहेत का?

# पत्रकारांच्या वेदनांचा हुंकार!

दुरचित्रवाहिणीचे जळगाव येथील पत्रकार किशोर पाटील यांनी पत्रकाराचं जगणं काव्यरूपात मांडले तेव्हा पत्रकार परिषदेत उपस्थित शंभरपेक्षा अधिक पत्रकारांच्या डोळ्यात पाणी तरळले. तर धुळ्यात ज्येष्ट संपादकांनी कोरोनानंतर वृत्तपत्रांच्या खपाची परिस्थिती बदलली तरी सरकारच्या जुन्याच नियमांमुळे स्थानिक संपादकांची कशी प्रशासकीय पातळीवर लुट चालू आहे याचे भयान वास्तव मांडले. अमरावतीत काहींनी, पत्रकार जेव्हा आजारी पडतो, अपघातात मृत्यूमुखी पडतो तेव्हा त्याची कुटूंबाची आणि त्याची किती बिकट अवस्था होते हे सांगताना प्रामाणिकपणे काम करून पदरी काय तर उपेक्षा आणि पश्चात्ताच हे समोर आणलं. वृध्दत्व, आजारपण, अपघात झाल्यानंतर ज्या माध्यम संस्थेत काम करतो ते ही मदत करत नाही आणि सरकारने तर वार्यावर सोडून दिलेले असल्याने अपेक्षेने पहावे कुणाकडे? असे प्रश्न उपस्थित केले. महानगरात काम करणार्या नामवंत पत्रकारांनाही जिल्हा, तालुका, गाव पातळीवरील पत्रकारांचे काहीच सोयर सुतक नाही. त्यामुळे लोकशाही व्यवस्थेत चौथा स्तंभ म्हणून मानल्या जाणार्या क्षेत्रातील सामान्य पत्रकारांच्या वेदनांचा हुंकार संवाद यात्रेतून जागोजागी बाहेर पडतो आहे. आणि याच हुंकारातून पत्रकारांच्या एकीचे आणि पत्रकारांकडे असलेल्या मतांच्या शक्तीचे दर्शन सरकारला घडविण्याचा निश्चय ठिकठिकाणचे पत्रकार करू लागले आहेत.

भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच समाजाचे प्रश्न मांडणार्या स्थानिक माध्यमांच्या मागण्यांसाठी दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २८ जुलैला सुरूवात झाली. मंत्रालय विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे व माजीअध्यक्ष चंदन शिरवाळे यांनी हिरवा झेंडा दाखवला. सरचिटणीस विश्वास आरोटे आणि कार्याध्यक्ष यात्रा संयोजक प्रविण सपकाळे यांच्या नियोजनात पहिल्याच दिवशी विविध पन्नास सामाजिक संघटनांनी पत्रकारांच्या न्याय मागण्यांना पाठींबा देवून सरकारने मागण्या मंजूर कराव्यात असे आवाहन केले. लोकशाही व्यवस्थेत पत्रकार प्रमुख घटक असला तरी या घटकाची अवस्था काय? कोरोनानंतर वृत्तपत्रांचा खप कमी झाला. अनेक वृत्तपत्रांनी आवृत्त्या बंद केल्या. स्थानिक पातळीवरील वृत्तपत्रांना मिळणार्या जाहिरातील कमी झाल्याने आणि वाढलेले कागदाचे दर आणि विक्री किंमत यामुळे वर्तमानपत्र चालवणे कठीण झाले आहे. परिणामी दहा–वीस वर्षे काम केलेल्या पत्रकारांना नोकरी गमवावी लागली आहे. तर काम करत असणार्यांना अत्यंत कमी पगारात काम करण्याची वेळ आली आहे. ग्रामीण भागातील वार्ताहरांना तर आता मानधन मिळणेही जवळपास बंद झाले आहे. वृत्तवाहिण्यात काम करणार्या पत्रकारांना पुर्वी स्टोरीवर मानधन मिळत असे आता बातम्यांचा कोठा देवून त्यांना कोणत्याही सुविधा न देता राबवले जाते. हे वास्तव जागोजागी पत्रकारांनी मांडले. वृत्तपत्रांचा उत्पादन खर्च आणि विक्री किंमत यातील तफावत जाहिरातीमधून भरून निघणे अवघड झाले आहे. कोरोनानंतर बहुतांशी व्यवस्थापने सोशल मिडीयातून जाहिरात करत आहेत तर सरकारनेही वर्तमानपत्रांना दिल्या जाणार्या जाहिराती कमी केल्या आहेत. वर्तमानपत्राची विक्री किंमत ठरविण्याचे धोरण काय आहे? प्रत्येक उत्पादनाची किमत (एमआरपी) ठरविण्याचे धोरणे आहेत. मग वर्तमानपत्रांचे काय? असेही प्रश्न समोर आले. मध्यंतरी मोठ्या वृत्तसमुहाने स्थानिक आवृत्त्या काढून स्वस्तात देण्याची स्पर्धा सुरू केली. परिणामी जिल्हा, तालुका, गावपातळीवरील वर्तमानपत्रे आणि पत्रकार यामुळे अडचणीत आले. परिणामी व्यावसायीक पातळीवर वर्तमानपत्रे परवडत नसल्यामुळे अनेक वर्तमानपत्रांनी प्रकाशने केली आहेत. त्यामुळे पत्रकारांसह या व्यवसायातील इतर कर्मचार्यांवर बेकारीची कुर्हाड कोसळली आहे. सर्वच माध्यमातील




पत्रकार विविध समस्यांनी आणि प्रश्नांनी त्रस्त झाले आहेत. मात्र समाजाचे प्रश्न मांडणार्या या पत्रकारांना आपल्या समस्या मांडण्यासाठी मात्र आपल्याच माध्यमात जागा नाही. प्रामाणिकपणे काम करणार्या पत्रकाराला सुरूवातीला आमिष दाखवून जवळ घेतले जाते अन्यथा माध्यम समुहच विकत घेवून खरे लिहिणार्या पत्रकाराला बाजूला केले जाते. तर अनेकठिकाणी वैयक्तीक, कौटुंबिक पातळीवर अडचणीत आणले जाते. पत्रकार संरक्षण कायदा मंजूर झाला असला तरी त्याची स्थानिक पातळीवर अमलबजावणी होत नाही हे वास्तव अनेकठिकाणी पत्रकारांनी मांडले. उलट पत्रकारांवरच थेट खंडणीचे गुन्हे दाखल करण्यात आले. बातमी छापली किंवा प्रसिध्द केल्यानंतर आक्षेप असेल तर न्यायालयात दाद मागितली पाहिजे पण अलीकडे थेट फौजदारी गुन्हे दाखल करून पत्रकारांचा छळ केला जात आहे आणि काही ठराविक वर्ग जाणिवपूर्वक काही घटनांना समोर करून संपूर्ण माध्यम क्षेत्रालाच बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. माध्यमातील वरिष्टही वस्तुस्थिती न पाहता उपदेशाचे डोस पाजून मोकळे होतात हे वास्तव स्थानिक पातळीवरील पत्रकारांनी आपल्या व्यथांमधून मांडले. कोणत्याही व्यवस्थेला प्रश्न विचारणारे, खरे बोलणारे नको असतात, बरे बोलणारे, स्तुती करणारे गोड लागतात. अलीकडे तर सर्वच राजकीय नेते आणि कार्यकर्त्यांनी पत्रकारितेतीलच अनेकांना नोकरीला ठेवून पीआर निर्माण केला आहे. त्यामुळे त्यांना सर्वच माध्यम आणि पत्रकार आपल्याबरोबर आहेत असा भास होतो. परिणामी राज्यकर्ते आणि राजकारण्यांनी एकतर्फी संवाद सुरू करून प्रतिवाद आणि सर्वकष संवादाची पध्दतच कमी केली आहे. पत्रकार समाजातील प्रमुख घटक आहे आणि देशभरात ३५ हजार कोटीपेक्षा मोठा व्यवसाय असल्याने यावर लाखो लोकांचे रोजगार आता अवलंबून आहे. हे लक्षात घेवून सरकारने या क्षेत्रालाही आर्थिक पातळीवर सक्षम करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे आणि स्थानिक पातळीवरील पत्रकारांना न्याय देण्याची भूमिका घेतली तरच लोकशाहीत सामान्य माणसाचा आवाज बुलंद राहिल असाच विचार यात्रेत बहुतांशी ठिकाणी समोर आला आहे. मतपेटीचा विचार करूनच सरकार कोणत्याही घटकाला न्याय देण्याची मानसिकता ठेवत असेल तर प्रत्येक पत्रकार मतांचा गठ्ठा आहे हे आता पत्रकार सांगु लागले आहेत. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान वीस पत्रकार सक्रिय आहेत. प्रत्येक पत्रकाराच्या मोबाईलमध्ये दोन हजारापेक्षा अधिक नंबर असल्याने पत्रकारांचा गावातील सामान्य माणसापासून प्रमुखपर्यंतचा संपर्क असतो. प्रत्येक पत्रकाराने वैयक्तीक पातळीवर पाचशे मतदारांना जागृत केले तरी महाराष्ट्राच्या २८८ मतदारसंघातील तीस लाखापेक्षा अधिक मतांवर पत्रकारांचा सहजपणे प्रभाव पडतो, या वास्तवाची जाणिव पत्रकारांना होवू लागली आहे. लोकशाहीत मतांच्या आकड्यांवरच सरकार बनत असेल आणि बनलेले सरकार न्याय देण्यासाठीही मतांचाच विचार करत असेल तर पत्रकारांनीही जागृत होवून विचार करावा अशा भावनाही समोर आल्या. नागपूरपासून सुरू झालेल्या यात्रेला जागोजागी पत्रकारांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवत स्वागत केले. एकीच्या शक्तीचे बळ किती असते? याचा प्रत्यय जिल्हा, तालुका, शहर पातळीवर पत्रकार एकजुटीने नारा देत आहेत. पत्रकार म्हणजे छोटा पॅकेट बडा धमाका हे वास्तव स्थानिक पातळीवरून समोर येवू लागले आहे. नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला, शेगाव, जळगाव, धुळे ते शिर्डी प्रवासात गावपातळीवरील पत्रकारांनी विविध सामाजिक संघटना, राजकीय कार्यकर्ते यांना सहभागी करून पत्रकार यात्रेच्या पहिल्याच टप्प्यात लोकसंवादात परिवर्तन केले. सामान्य नागरिकांनीही उत्सुकता निर्माण झाल्याचे जागोजागी दिसून आले. चोवीस जिल्ह्याच्या ठिकाणी आणि पावणे दोनशे तालुक्यातून जवळपास चार हजार किलोमीटरचा प्रवास करत संवाद यात्रा मंगळवार दि.२० ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईत मंत्रालयावर पोहोचेल तेव्हा राज्यभर पत्रकारांच्या समस्यांचा जागर झालेला असेल. सामान्य पत्रकारांना आपल्याकडे असलेल्या मतांच्या शक्तीची जाणिव होईल आणि ही यात्रा माध्यमक्षेत्राला अधिक सक्षम आणि प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी यशस्वी होईल.

**– वसंत मुंडे,**
**प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई**

पान १ वरुन

## उत्तर भारतात पूर आणि

घरे, वाहने वाहून गेली. झाडांची मोठी पडझड झाली तसेच सगळीकडे एकच हाहाकार उडाला. राजस्थानला या पावसाचा मोठा फटका बसला आहे. शनिवार, रविवार सलग दोन दिवस राज्यामध्ये जोरदार पाऊस कोसळत होता. या दोन दिवसांमध्ये पावसामुळे उद्भवलेल्या विविध घटनांमध्ये एकूण १६ जणांचा मृत्यू झाला. यापैकी दोन मृत्यू शनिवारी तर १४ मृत्यू रविवारी झाल्याची नोंद करण्यात आली आहे. रविवारी, राजस्थानमधील करौली जिल्ह्यात ३८ सेमी इतक्या मुसळधार पावसाची नोंद हवामान विभागाने केली आहे.

दरम्यान, राजस्थानमधील नागरिकांच्या सुरक्षेला आम्ही प्रथम प्राधान्य देतो, अशी प्रतिक्रिया राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी सोशल मीडियावरून दिली आहे. तसेच मुख्यमंत्री कार्यालयामध्ये राज्यातील अतिवृष्टीबाबत अधिकाऱ्यांची बैठक घेतली असून आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सर्व व्यवस्था तातडीने पुरवण्यासाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

दरम्यान, पंजाब आणि हरियाणामध्येही अनेक ठिकाणी मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. हरियाणातील यमुनानगर जिल्ह्यातील सोम नदीच्या बंधाऱ्याला तडा गेल्याने अनेक गावे जलमय झाली आहेत. पंजाबमधील होशियारपुर येथे एका चारचाकी गाडीत एकूण ९ लोक प्रवास करत होते ते सर्व पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने मृत्युमुखी पडले. त्यामध्ये एकाच कुटुंबातील ८ जणांचा समावेश होता. अनेक ठिकाणी शेतीपिके पाण्याखाली गेली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. बचाव पथकाच्या अधिकाऱ्याने राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाला (एसडीआरएफ) पाचारण करण्यात आले असल्याचे सांगितले आहे.

हिमाचल प्रदेशातही भूस्खलन आणि अचानक आलेल्या पुरामुळे तीन मुलींचा मृत्यू झाला आहे, तर एक व्यक्ती बेपत्ता आहे. भीषण भूस्खलनामुळे २८० हून अधिक रस्ते वाहतूक करण्यासाठी योग्य राहिले नाहीत, त्यामुळे दळणवळण करण्यास समस्या निर्माण झाल्या आहेत. तसेच या रस्त्यांलगतच्या ४५८ ठिकाणी वीज आणि ४८ ठिकाणच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम झाला आहे. उत्तर प्रदेशातील जालौनमध्ये पावसामुळे घराचे छत कोसळल्याने एक महिला आणि तिच्या सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. उत्तराखंडमध्ये, भिंबली येथे मोठ्या भूस्खलनाने मंदाकिनी नदी पात्रातील पाणी इतरत्र वाहत असल्याने पूरस्थिती निर्माण झाली. याशिवाय जम्मू आणि काश्मीर प्रशासनाने सांगितले की अमरनाथ यात्रा परिसरात मुसळधार पाऊस कोसळत असल्याने दरवर्षी निघणारी अमरनाथ यात्रा स्थगित करण्यात आली आहे.

दिल्लीत मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचले तसेच वाहतूक कोंडीही झाली. शनिवारी रोहिणी जिल्ह्यातील सेक्टर २० येथील एका सात वर्षांच्या मुलाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. भारतीय हवामान विभागाने सांगितले की, राजधानी दिल्लीमध्ये आज मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास करणे टाळावे, शक्य असल्यास घरातच थांबावे अशाही इशारा भारतीय हवामान विभागाने दिल्लीकरांसाठी दिला आहे. दरम्यान, कर्नाटकात पंपा सागर धरणाच्या दरवाज्यातील बिघाडामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे, त्यानंतर तिथे पूरस्थितीचा इशारा देण्यात आलेला असून नागरिकांना सतर्क राहण्याचे सांगण्यात आले आहे

## पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली,..

फोडले. पक्ष फोडण्याचा विक्रम त्यांच्याच नावावर आहे. देशामध्ये पक्ष फोडण्याची स्पर्धा घेतली, तर शरद पवार यांना सुवर्णपदक मिळेल, असा टोला त्यांनी लगावला.

पुढे बोलताना, लोकसभ निवडणुकीत शरद पवार यांच्याबद्दल लोकांमध्ये सहानुभूती होती, असं वाटत नाही. फक्त माध्यमांतील काही लोकांनाच त्यांच्याबद्दल राज्यात सहानुभूती असल्याचं वाटतं. तेच लोक सतत सहानुभूतीचा डंका वाजतवत असतात, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली. तसेच राज्यात त्यांच्याबद्दल सहानुभूती असती, तर बीडची जागा त्यांनी फक्त ६ हजार मतांनी जिंकली नसती. ती जागा त्यांनी मतांचं ध्रुवीकरण करून जिंकली, असेही ते म्हणाले.

लोकसभा निवडणुकीत शरद पवार यांनी अतिशय अनुभवाने आपल्या जागा निवडल्या आणि त्याचं श्रेय त्यांना द्यावंच लागेल. कुठे सरकारविरोधात वातावरण आहे, त्याचा अभ्यास करूनच त्यांनी जागा लढवल्या. विधानसभा निवडणुकीतही ते कमी आणि मोजक्याच जागा लढवतील, असं वाटतं, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## १७ लाख राज्य सरकारी ..

सभेत झाला. राज्य सरकारने पेन्शनबाबत जे आश्वासन दिले ते अद्याप पाळण्यात आलेले नाही. सामाजिक आणि आर्थिक सुलक्षण म्हणून जुन्या पेन्शनप्रमाणे पेन्शन मिळेल, असे आश्वस्त करुनसुद्धा त्या संदर्भातील नोटीफिकेशन निघू शकलेले नाही. त्यामुळे सर्व कर्मचारी, शिक्षक हे चिंतेत आहेत, असे काटकर म्हणाले. राज्य सरकारने तत्काळ नोटिफिकेशन काढण्याची मागणी कर्मचारी संघटनेकडून करण्यात आली आहे. तसेच नोटिफिकेशन निघत नाही, तोपर्यंत संप सुरु ठेवण्याचा निर्धार संबंधित कर्मचारी संघटनेने केला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीआधी पुन्हा आचारसंहिता लागू होण्यापूर्वी कोणते निर्णय किती वेळात घेतले जातील, याची साशंकता निर्माण झाली आहे. त्यामुळेच राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षकांची सहनशीलता संपलेली आहे. त्यामुळे त्यांनी २९ ऑगस्टपासून राज्यभरात बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतलेला आहे, अशी माहिती काटकर यांनी दिली.

## महाराष्ट्रात येत्या काही

कळतंय की मतदार राजा आमच्याबरोबर होता. बाकी सगळे निघून गेले होते. असं म्हणत सुप्रिया सुळेंनी अजित पवारांना टोला लगावला.आमचं भाग्य आहे की आम्हाला तुम्हा सगळ्यांचा विश्र्वास, प्रेम आम्हाला लाभलं हेच नातं आम्ही कायम ठेवू. बारामती ही आपली आन, बान आणि शान आहे. नवले ब्रिजवर अपघात व्हायचे आपण नितीन गडकरींची मदत घेतली. आता इंदु चौकातही आपल्याला तसाच मार्ग काढायचा आहे, तो रस्ता आता आपल्याला सुधारयाचा आहे असं सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. पुण्यात, बारामतीत अपघात वाढत चालले आहेत, गुन्हे वाढत आहेत. चांगलं प्रशासन द्यायचं असेल तर आपल्याला सरकार बदलायचं आहे हे लक्षात ठेवा. येत्या काही महिन्यांमध्ये आपलं सरकार येणार आहे. असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.सुप्रिया सुळे पुढे म्हणाल्या, मला परवाच एका पत्रकाराने सांगितलं की बारामतीत जे घडलं ते अपेक्षित नव्हतं. मी त्यांना सांगितलं की लोकांनी आम्हाला निवडून दिलं आहे. मी अंडर कॉन्फिडंट होते आणि ते ओव्हर कॉन्फिडंट होते. पण आज तुम्हाला सांगते बारामती आणि शिरुर मतदारसंघ एकाच माणसाला कळतो त्या माणसाचं नाव आहे शरद पवार. शरद पवार आणि तुमचं हे प्रेमाचं नातं आहे ते काही कुठल्या योजनेचं नातं नाही. एक लक्षात घ्या नाती १५०० रुपयांनी जोडली जात नाहीत. कुणीतरी म्हणालं की एक गेली म्हणून बाकीच्या बहिणी जोडल्या. पण तसं होत नाही असं म्हणत सुप्रिया सुळेंनी लाडकी बहीण योजनेवरुनही अजित पवारांना टोला लगावला. पैशांच्या नात्याने व्यवहार होतात, नातं जुळत नाहीत. झालं गेलं गंगेला मिळालं त्यांनाही शुभेच्छा जिथे असेल तिथे सुखाने नांदा. असंही सुप्रिया सुळे ( डींाीळूर डींश्रश ) म्हणाल्या. रविवारी माझा फोन हॅक झाला. मी जयंत पाटील यांना मेसेज केला तर भलतंच कुणीतरी उत्तर देतं आहे. मी म्हटलं पक्ष गेला, चिन्ह गेलं, सगळं गेलं आता मोबाइलही हॅक झाला होता असंही सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. आता फोनमुळे सगळं गेलं, किती वाजले ते पण फोनवर पाहतो. येत्या काही महिन्यांत आपलंच सरकार येणार आहे. काहीही झालं तरीही तुतारी विसरायची नाही तिला फार महत्त्व आहे असंही सुप्रिया सुळेंनी म्हटलं आहे.

## भारतात जुलै महिन्यात किरकोळ महागाईचा दर घसरला,

नवी दिल्ली : किरकोळ महागाई दर सरलेल्या जुलै महिन्यात किंचित घटून ३.४५ टक्क्यांवर म्हणजेच पाच वर्षांच्या नीचांकी पातळीवर पोहोचला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ महागाई दराची आकडेवारी सोमवारी जाहीर केली. एप्रिल महिन्यात ४.८३ टक्के असलेला किरकोळ महागाई दर घसरण होऊन मे महिन्यात तो ४.७५ टक्क्यांवर आला. ही त्याची मे २०२३ नंतरची नीचांकी पातळी ठरली. त्यावेळी महागाई दर ४.३१ टक्के पातळीवर होता. खाद्यवस्तूंतील किंमतवाढ मे महिन्यात ८.६९ टक्के नोंदविण्यात आली. एप्रिलमधील ८.७० टक्क्यांच्या तुलनेत ती नाममात्र घसरली असली, तरी एकूण निर्देशांकातील २६ टक्के घटकांमधील किंमतवाढीचा दर ५ टक्क्यांच्या आसपास राहिला, जो जानेवारी २०२० नंतरचा नीचांकी स्तर आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग साखर कारखान्याचा देश पातळीवरील प्रथम पुरस्काराने सन्मान




**दैनिक यशसिद्धी न्यूज**

श्रीपुर/प्रतिनिधीः कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन को-ऑपरेटिव शुगर फॅक्टरी लि. नवी दिल्ली यांचा तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम पुरस्कार जाहीर झाला होता सदर पुरस्काराचे वितरण आज रोजी नवी दिल्ली येथे देशाचे सहकार राज्यमंत्री कृष्ण पाल व चौधरी लक्ष्मीनारायण सिंह - सहकार मंत्री उत्तर प्रदेश, आणि नॅशनल फेडरेशन कॉपरेटिव शुगर फॅक्टरी लि. नवी दिल्लीचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला पुरस्कार कारखान्याचे व्हा चेअरमन कैलास खुळे ,सर्व संचालक, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी यांनी स्वीकारला कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना हा नेहमीच देशात अग्रेसर राहिला असून गत हंगाम २०२३- २४ मध्ये गाळप क्षमतेचा पुरेपूर वापर, स्टीमची बचत, कारखाना बंदचे अत्यल्प प्रमाण ,बगॅसची बचत, जास्तीची वीज निर्मिती ,जास्तीचा साखर उतारा याशिवाय अन्य तांत्रिक बाबीमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्यामुळे कारखान्यास देश पातळीवरील तांत्रिक कार्यक्षमतेचा प्रथम पुरस्कार मिळाला असून यामध्ये कारखान्याचे व्हा चेअरमन, सर्व संचालक मंडळ कार्यकारी संचालक डॉ.यशवंत कुलकर्णी व कारखान्याचे अधिकारी त्याचबरोबर ऊस पिकवणाऱ्या सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे श्रेय असल्याची भावना कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी व्यक्त करून या सर्वांचे अभिनंदन केले.

गत हंगामामध्ये कारखान्याची गाळप क्षमता १०००० प्रतिदिन मे टन केली असून त्याप्रमाणे गाळप होत आहे या हंगामासाठी कारखान्याकडे सुमारे अकरा हजार हेक्टर क्षेत्राच्या नोंदी असून त्यामधून बारा ते साडेबारा लाख मॅट्रिक टन उपलब्ध होईल असा अंदाज आहे.कारखान्याने दिलेला ऊस दर व उत्तम व्यवस्थापन यामुळे कारखान्यास ऊस देणाऱ्या शेतकऱ्याचा कल जास्तीचा असून टनेजमध्ये वाढ होईल कारखान्यास उसाचा सुरळीत व विनाखंड पुरवठा व्हावा यासाठी कारखान्याने पाच ऊस तोडणी यंत्रे खरेदी केली असून ऊस तोडणी वाहतुक ठेकेदारांचे करारही केलेले आहेत अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी दिली.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना संघ लिमिटेड नवी दिल्ली यांचे कडून मिळालेला पुरस्कार स्वीकारण्यासाठी कारखान्याचे व्हा.चेअरमन कैलासराव खुळे , दिनकरभाऊ मोरे, दाजी पाटील, तानाजी वाघमोडे बाळासाहेब यलमार, भगवानराव चौगुले , भास्कर कसगावडे, लक्ष्मण धनवडे , गंगामामा विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, दिलीप गुरव, शामराव साळुंखे, राणू पाटील कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी उपस्थित होते.

> कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास या अगोदर व्यवस्थापनाने उत्कृष्ट काम केल्यामुळे राज्य पातळीवरील व देशपातळीवरील ५५ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे हा आज मिळालेला देशपातळीवरील तांत्रिक कार्यक्षमतेच्या पुरस्कारामुळे कारखान्याच्या शिरपेचात आणखी एक तुरा रोवला गेला आहे
>
> **-प्रशांत परिचारक - चेअरमन**

# निफाड महाविद्यालयामध्ये एक राखी सीमेवरील सैनिकासाठी उपक्रम संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : भारताच्या सीमारेषेवरील जवान नेहमीच डोळ्यात तेल घालून आपणा सर्व भारतवासीयांचे संरक्षण करत असुन. मानवी जीवनामध्ये जे वेगवेगळे नैसर्गिक, मानवनिर्मित संकटे येतात या संकटातून सोडवण्यासाठी आपले सैनिक नेहमीच तत्पर असतात .अशा धाडसी व शूर जवानांसाठी त्यांच्या संरक्षणासाठी, त्यांचे मनोबल, धैर्य वाढविण्यासाठी असे उपक्रम प्रेरणादायी ठरतात.सैनिकांवरील बंधुप्रेम, देश प्रेम, राष्ट्रीय एकात्मता व्यक्त करण्यासाठी तसेच सैनिकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी कर्मवीर गणपत दादा मोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय निफाडच्या मराठी विभागाच्या वतीने प्राचार्य.प्रो.डॉ एस .व्ही. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. याप्रसंगी मराठी विभाग प्रमुख डॉ.सुनीता उफाडे यांनी मनोगत व्यक्त केले.त्या म्हणाल्या की, आजच्या या धकाधकीच्या गतिमान जीवनात नीतिमूल्यांची पायमल्ली होताना दिसते. परंतु अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांना आपले भारतीय



सण, संस्कृती, नीतिमूल्य जतन करून जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघण्याचा मूलमंत्र त्यांनी दिला. डॉ सीमा डेरले जिजामाता मंचच्या अध्यक्ष म्हणाल्या की, आपल्या घरापासून हजारो मैल दूर असलेल्या सैनिकांसाठी विद्यार्थ्यांच्या मनामध्ये जिव्हाळा प्रेम आपलेपणाची भावना, देशनिष्ठा निर्माण होण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. मालती वाघावकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना देशवासिय म्हणून आपली कोणती कर्तव्य आहेत याबद्दल मार्गदर्शन केले. सुनिता कुंदे यांनीही मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील मराठी विषयाच्या १५ विद्यार्थिनींनी आपल्या सैनिक बांधवांसाठी पत्र लिहिली. तर ४१० राख्या सैनिकांसाठी जिजाऊ महिला मंच च्या माध्यमातून पाठवण्यात आल्या. याप्रसंगी महाविद्यालयातील डॉ .सुजान लॉरेन्सिया,डॉ. सुरेखा जाधव, श्रद्धा गवळी, मनीषा कोटकर, श्रीमती सविता कापसे , श्रीमती.धूम व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पडघ्यात जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्साहात साजरा

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

भिवंडी/मिलिंद जाधव :आदिवासी संस्कृती टिकवण्यासाठी, आदिवासी संस्कृतीला उजाळा देण्यासाठी भिवंडी तालुक्यातील पडघा येथे आदिवासी राजा युवा फाउंडेशनच्या वतीने जागतिक आदिवासी दिन पडघा विभागात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महामानवांच्या प्रतिमांना पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करून आदिवासी राजा युवा फाउंडेशनच्या कार्यालयाचे पडघा येथे उद्घाटन करण्यात आले. यावेळी मनसे भिवंडी लोकसभा जिल्हा अध्यक्ष शैलेश बिडवी, शंभूराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.निवृत्ती मगर, इताडे ग्रामपंचायतीचे सरपंच जगन पाटील, पडघा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच



पराग पाटोळे, भादाणे ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रदीप भोईर, उद्योगपती प्रफुल शेलार , सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर, आदिवासी राजा युवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष

प्रशांत वाघे, प्रफुल शेलार कवी , पत्रकार मिलिंद जाधव. तर आदी उपस्थित होते. यावेळी आदिवासी बांधवांनी तारपा नृत्य सादर करीत नागरिकांची मने जिंकली. तर कवी,मिलिंद जाधव यांनी आम्ही आदिवासी ,या देशाचे मूळ रहिवासी ही कविता सादर केली. तर तर मनसे भिवंडी लोकसभा जिल्हा अध्यक्ष शैलेश बिडवी , शंभूराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.निवृत्ती मगर यांनी जागतिक आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देत मनोगत व्यक्त केले. पडघा विभागातील परिसरात बाईक रॅली काढण्यात आली होती. यामध्ये मोठ्या प्रमाणात तरुण वर्गाचा समावेश होता. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आदिवासी राजा युवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत वाघे, संपर्कप्रमूख अरुण गवते,उपाध्यक्ष अंकुश वाघे, सचिव प्रकाश वाघे, ठाणे जिल्हा प्रमुख विजय हरड , सल्लागार योगेश वाघे,रोशन वाघे, आकाश कातकरी यांनी मेहनत घेतली यावेळी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक ,राजकीय तर पडघा विभागातील आदिवासी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश शिंदे यांनी केले.

# डी.फार्मसी प्रवेशासाठी ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रिया सुरू

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित डी. फार्मसीच्या प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रियेसाठी फॅसिलिटेशन सेंटर म्हणुन स्वेरीच्या डी. फार्मसी महाविद्यालयांना मान्यता मिळाली असून गुरुवार (दि. ०८ ऑगस्ट २०२४) पासून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, कागदपत्रे पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रिया सुरू झाली असून ही प्रक्रिया बुधवार दि. २८ ऑगस्ट २०२४ पर्यंत चालणार आहे, अशी माहिती प्राचार्य प्रा. सतीश मांडवे यांनी दिली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये डी.फार्मसी प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करणे, भरलेले अर्ज स्विकारुन प्रमाणपत्रे, कागदपत्रांची तपासणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रिया करण्याकरिता मुंबई येथील मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य (डी.टी.ई) यांचे अधिकृत केंद्र (एफ.सी. क्र.-६५०५) म्हणून स्वेरीच्या डी. फार्मसी महाविद्यालयास मान्यता मिळाली आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी प्रथम वर्ष डी. फार्मसी प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन,पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होणारी अडचण व शंका याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी सुविधा केंद्र सुरु केले आहे. यंदाचे हे डी. फार्मसीचे १६ वे वर्ष असून महाविद्यालयाने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे.

प्रथम वर्ष डी. फार्मसी प्रवेशाकरिता बारावी सायन्स परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ही प्रकिया दि. ०८ ऑगस्ट २०२४ पासून ते दि. २८ ऑगस्ट २०२४ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत चालणार आहे. याचा लाभ बारावी सायन्स मधून उत्तीर्ण विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी घेण्याचे आवाहन केले आहे. या कालावधीत प्रमाणपत्रांची पडताळणी, छाननी व नोंदणी आदी प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे.स्वेरी फार्मसी मध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्यामुळे आणखी एका डी. फार्मसी महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली आहे.

डी. फार्मसीच्या प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी मोबा.क्र. ९९२१७६२७२८ व ९५१८९८४१८२ यावर संपर्क साधण्याचे आवाहन प्राचार्य प्रा. सतीश मांडवे यांनी केले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली डी. फार्मसीच्या फॅसिलिटेशन सेंटरमध्ये सर्व यंत्रणा सज्ज असल्याचे दिसून येत आहे.

# निफाड येथे आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने देशमुख सन्मानित

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

निफाड/प्रतिनिधी : सहकार महर्षी त्र्यंबकराव घुगे (गुरुजी ) भाग्यश्री पतसंस्था निफाड यांचे कडुन एस . बी . देशमुख यांना जिल्हास्तरीय आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने खासदार भास्कर भगरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.नुकताच निफाड येथे देवकृपा लॉन्स मध्ये भाग्यश्री पतसंस्था यांच्या १९ व्या वर्धापन दिनानिमित्त गुणवंत विद्यार्थी व आदर्श शिक्षकांचा सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते,

याप्रसंगी आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने एस बी देशमुख यांना खासदार भास्कर भगरे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले आहे. उपक्रमशील मुख्याध्यापक म्हणुन जिल्हा व राज्य स्तरावर उत्कृष्ट काम असल्याने त्यांच्या कामाची दखल घेऊन हा पुरस्कार देण्यात आला . या वेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष




आमदार दिलीप बनकर तर प्रमुख वक्ते ह .भ.प . रामकृष्ण महाराज लहवितकर ह .भ.प . संजय महाराज धोंडगे हे होते या वेळी आ .डॉ सुधीर तांबे, मविप्र चे अध्यक्ष डॉ.सुनिल ढीकले ,मा.चेअरमन निफाड सह कारखाना माणिकराव बोरस्ते, निफाड नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अनिल पा कुंदे, सरचिटणीस व्हि.एन.नाईक शिक्षण संस्थेचे हेमंत आप्पा धात्रक, मविप्र चे सभापती बाळासाहेब शिरसागर, रमेश आप्पा घुगे, दिगंबर गिते , , तानाजी जायभावे , गुरुनाथ कांदे , संचालक नाफडे केदा नाना आहेर ,डी बी ढोमसे, योगेश* मुरकुटे आदी मान्यवर उपस्थित होते . कोणताही प्रस्ताव न मागवता कामाची प्रत्यक्ष पाहणी करून ह्या पुरस्कारांची निवड करण्यात आली.आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून एस बी देशमुख यांचें अभिनंदन केले जात आहे

# शुरयोद्धा गोविंद गोपाळ यांची जयंती साजरी

भीमा कोरेगाव : छत्रपती संभाजी महाराज यांचे देहावर अंत्यविधी करणारे शुरयोद्धा गोविंद गोपाळ गायकवाड यांच्या जयंती निमत्त वढू बु. ता शिरूर जिल्हा पुणे येथील त्यांच्या समाधी स्थळी पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलन करून त्रिसरण पंचशील ग्रहण करून त्यांच्या स्मृतीस मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. बुद्धिस्ट प्रेरणा ग्रुप महाराष्ट्र राज्य या संघटनेचे अध्यक्ष किरण शिंदे, गोविंद गोपाळ यांचे वंशज पांडुरंग गायकवाड, संदीप गायकवाड, जय गायकवाड,विभागीय पोलिस अधिकारी प्रशांत ढोले, पोलिस निरिक्षक दिपरत्न गायकवाड, कोरेगाव भिमा विजयस्तंभ सेवा संघाचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे,बार्टीचे रामदास लोखंडे, रिपब्लिकन सेनेचे पुणे जिल्हा अध्यक्ष निलेश गायकवाड, भारतीय बौद्ध महासभा हवेली तालुका अध्यक्ष सुनिल अवचार, कोमल वासनिक, सनी कांबळे, माया गायकवाड मायादेवी मस्के पत्रकार नंदकुमार जोगदंड, सुमित गायकवाड, विकास ओव्हाळ, केतन जगताप, बळीराम गायकवाड, विजय गायकवाड, स्वप्नील गायकवाड यांचेसह भीमसैनिक उपस्थित होते. धम्मपालन गाथा घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# प्रा.डॉ.उध्दव भाले यांना संशोधनातील भारतीय पेटंट

**दैनिक यशसिद्धी न्यूज**



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडेः येथील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विषयाचे प्राध्यापक डॉ. उध्दव भाले यांना विविध वनस्पतीमधील मानवासाठी उपयुक्त असणारे पोषक अन्नद्रव्ये कोणते असू शकतात यावर आधारीत फायटोकेमिकल विश्लेषणासाठी मल्टीचेंबरड डिव्हाइस यासाठी भारतीय पेटंट नुकतेच मिळाले आहे. डॉ भाले हे सातत्याने संशोधनाचे कार्य करीत असतात , त्यांचे आतापर्यंत १७० पेक्षा जास्त शोध निबंध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रकाशित झालेले आहेत. सत्तर पेक्षा जास्त राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात त्यांनी आपला सहभाग नोंदविला आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत १२ विध्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे आणि सद्या ७ विध्यार्थ्यांचे संशोधन चालू आहे. त्याचबरोबर त्यानी युजीसी, डीएसटी चे प्रकल्पही पूर्ण केलेले आहेत. त्यांचे संशोधन हे पिकावरील पडणाऱ्या रोगांचे एकात्मिक पद्धतीने निमूर्लन आणि पिकांची सेंद्रीय पद्धतीने वाढ यावर आधारीत आहे. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड, कार्यालयीन अधिक्षक श्री.धनंजय पाटील आणि महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी कॅबीनेट मंत्री मा. मधूकररावजी चव्हाण, सचिव मा. उल्हासदादा बोरगांवकर आणि संस्थेच्या सर्व संचालकानी व गावातील नागरिकांनी व प्रा. दिपक जगदाळे सह प्राध्यपक वृद्ध कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे

# पत्रकार संवाद यात्रेच्या दुसऱ्या टप्प्याची वृत्तपत्र दिंडीने सुरूवात

## छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौकात १३ ऑगस्ट रोजी होणार

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी : लोकशाहीच्या बळकटीसाठी, पत्रकारांच्या न्याय हक्कांसाठी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली दि.२८ जुलैपासून सुरू झाली आहे. दुसर्या टप्याची सुरूवात छत्रपती संभाजीनगर येथून १३ ऑगस्ट रोजी वृत्तपत्र दिंडीने होणार आहे. ऐतिहासिक क्रांती चौकातून सकाळी १० वाजता यात्रेला सुरूवात होईल. त्यावेळी वृत्तपत्रे विक्रेते, संपादक, पत्रकार व विविध सामाजिक राजकीय संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत अशी माहिती छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभु गोरे यांनी दिली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली वृत्तपत्र व पत्रकारांच्या मागण्या सरकारला सांगण्यासाठी आणि राज्यभरातील पत्रकारांच्या विषयावर जनजागृती करण्यासाठी दिक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रा २८ जुलै पासून सुरू झाली आहे. पहिल्या टप्यात विदर्भ, खान्देश, उत्तर महाराष्ट्रातील पंधरापेक्षा अधिक जिल्ह्यातुन या यात्रेने प्रवास केला आहे. पत्रकारांचा आणि विविध सामाजिक संस्थांचे मोठे समर्थन यात्रेला मिळाल्याने पत्रकारांच्या या यात्रेचे वादळ घोंगावू लागले आहे. दुसर्या टप्यातील यात्रेचा शुभारंभ १३ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगरमधील ऐतिहासिक क्रांती चौकातून होणार असुन मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, पुणे, कोकण, ठाणे विभागातून ही यात्रा २० ऑगस्ट रोजी मुंबईत मंत्रालयावर जाणार आहे. यावेळी वृत्तपत्र विक्रेत्यांच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडी निघणार आहे. यावेळी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्यासह सरचिटणीस डॉ.विश्वास आरोटे, कार्याध्यक्ष प्रविण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर, विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी वृत्तपत्र विक्रेता संघाचे पदाधिकारी सदस्य आणि विविध सामाजिक राजकीय संस्थांचे प्रतिनिधी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या शुभारंभाला जास्तीत जास्त पत्रकार व वृत्तपत्र विक्रेत्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाध्यक्ष डॉ.प्रभू गोरे, वर्तमानपत्र विकेता संघटनेचे जिल्हाध्यक्ष नीलेश फाटके, ग्रामीण जिल्हाध्यक्ष शांताराम मगर, उपाध्यक्ष छबूराव ताके, संघटक विलास शिंगी, महानगर अध्यक्ष अनिल सावंत, कोषाध्यक्ष मुकेश मुंदडा, प्रसिद्धी प्रमुख मनोज पाटणी, वर्तमान पत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष काकासाहेब मानकापे, सचिव गणेश भोसले, कार्याध्यक्ष शेख फईम, उपाध्यक्ष अण्णासाहेब जगताप, प्रसिद्धी प्रमुख भीमराव वायभट, शिवाजी ढेपले यांनी केले आहे.




### वर्तमानपत्र विक्रेता संघटनेच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडी

पत्रकार संवाद यात्रेच्या दुसर्या टप्प्याचा शुभारंभ छत्रपती संभाजीनगर वर्तमानपत्र विक्रेता संघटनेच्या सहभागाने वृत्तपत्र दिंडीने होणार आहे. या वृत्तपत्र दिंडीत सर्वच वर्तमानपत्र व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे संपादक, वृत्तपत्र विक्रेते, पत्रकार, राजकीय पुढारी, सामाजिक कार्यकर्ते, नागरीकांचा सहभाग राहणार आहे.



# क्रीडाभारती संघटनेच्या अध्यक्षपदी अमोलराजे भोसले यांची नियुक्ती

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट शहर व तालुक्यात खेळाचा व्यापक विस्तार करून अधिक गुणवान खेळाडू आणि खेळाच्या माध्यमातून संस्कार,सशक्त,सक्षम व चारित्र्यवान व्यक्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रव्यापी संघटन असलेल्या क्रीडाभारती संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी,श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांची नियुक्ती करण्यात आली.याप्रसंगी क्रीडाभारतीचे जिल्हापदाधिकारी राजेंद्र कळमणकर,ज्ञानेश्र्वर म्याकल, डॉ.विलास हरपाळे,अरुण उपाध्ये यांनी अमोलराजे भोसले यांना नियुक्तीपत्र देऊन सत्कार केले.यावेळी प्रास्ताविक क्रीडाभारती चे तालुका संयोजक अभिजित लोके सर यांनी केले.तर स्वागत तालुकामंत्री प्रकाश सोनटक्के यांनी केले.या प्रसंगी मार्गदर्शक व निवृत्त मुख्याध्यापिका कु.उषाताई हंचाटे,क्रीडाशिक्षक परमेश्र्वर व्हसुरे ,कल्याणी लकशेट्टी,बाबुराव पवार, दत्तात्रय बिराजदार,सर्जेराव माशाळ, शंभूराजे गाटे आदी उपस्थित होते. या वेळी अक्कलकोट तालुका क्रीडाभारती पदाधिकारी मंडळ व कार्यकारिणी सदस्य जाहीर करण्यात आले.ते पुढील प्रमाणे अध्यक्ष अमोलराजे भोसले,उपाध्यक्ष महिबुब शेख,महिला उपाध्यक्ष उषाताई हंचाटे,तालुकामंत्री प्रकाश सोनटक्के, सहमंत्री नागराज कलबुर्गी,परमेश्र्वर व्हसुरे,कल्याणी लकशेट्टी,खजिनदार अमोल कोकाटे,क्रीडांगण प्रमुख अविनाश राठोड,उपप्रमख दत्तात्रय हिल्ली, इकबाल टिनवाला,संयोजक अभिजित लोके आणि कार्यकारिणी सदस्य म्हणून दत्तात्रय बिराजदार, अरविंद शिंदे,उमेश नेवाळे,बाबुराव पवार,दयानंद उटगे,अमर पराड,शंभू गाटे,आनंद पाटील,सिद्धेश्र्वर घुगरे,कुमार जाधव,दयानंद दणुरे,प्रशांत राचेटी यांची निवड झाली.शेवटी राजेंद्र कळमनकर यांनी आभार मानले.

# बस स्थानक परिसरातील घाणीचे साम्राज्य पाहून आमदार समाधान आवताडे संतापले; अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी आणि दक्षिण काशी अशी ओळख असलेल्या पंढरपूरला दरवर्षी लाखो भावी आपल्या लाडक्या विठुरायाच्या दर्शनासाठी येत असतात. शेतकऱ्यांचा देव अशी ओळख असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी पंढरपूरला येणारा भाविक बहुतांश एसटी बसने प्रवास करतो. आपल्या गावावरून पंढरपूरला उतरल्यानंतर त्या भाविकांना मूलभूत सुविधा उपलब्ध असाव्या आणि बस स्थानक परिसरात स्वच्छता असावी ही माफक अपेक्षा या भाविक प्रवाशांचे असते.



मात्र पंढरपूर बस स्थानक परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले असून स्वच्छ पिण्याचे पाणी देखील उपलब्ध नाही. बस स्थानक परिसरात जागोजागी घाण व कचरा साठलेला आहे. याबाबत अनेक माध्यमातून बातम्या प्रसारित झाल्या आहेत. तसेच जागरूक नागरिक आणि प्रवाशांनी वारंवार बस स्थानक प्रशासनाकडे तक्रारी करून देखील दुर्लक्ष केले जात होते.

या सर्व बाबी पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी अचानक पंढरपूर बस स्थानकाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. त्यामध्ये बस स्थानकातील शौचालय, पिण्याचे पाणी, फलाट, तसेच बस स्थानकाच्या बाहेर आणि आपली बाजूस असलेले व्यापारी गाळे, या ठिकाणी जागोजागी कचरा व घाण साठलेली पाहायला मिळाली. त्यामुळे आमदार समाधान आवताडे चांगलेच संतप्त झाले आणि त्यांनी महामंडळ अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. यावेळी आगार व्यवस्थापक आणि स्थानक प्रमुख गैरहजर होते. त्यांना आमदार समाधान आवताडे यांनी फोन करून स्वच्छता कंत्राटदार कोण आहे. आणि तो योग्य पद्धतीने त्याचे काम करत नसेल तर त्याच्यावर कारवाई का केली जात नाही असा सवाल केला. यावेळी त्यांच्यासोबत प्रांत अधिकारी सचिन इथापे, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, पंढरपूर शहर चे पोलीस निरीक्षक विश्र्वजीत घोडके, नगर परिषदेचे उपमुख्य अधिकारी सुनील वाळुंजकर, परिवहन महामंडळाचे वाहतूक निरीक्षक दळवे, यांच्यासह इतर अधिकारी व आमदार समाधान आवताडे यांचे कार्यकर्ते प्रवासी व बस स्थानक परिसरातील व्यापारी उपस्थित होते.

# पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीची बैठक ठरली वादळ

**दैनिक यशसिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधीः काँग्रेस कार्यकर्त्याच्या एकीचे दर्शन घडवणारी पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीची बैठक शुक्रवारी पंढरीत पार पडली पंढरपूर



विधानसभेची जागा काँग्रेसच्या वाटेला पूर्ववत मिळावी असा एकमुखी ठराव बैठकीत करण्यात आला हा ठराव काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे आणि प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती बैठकीचे अध्यक्ष तालुकाध्यक्ष हनुमंत मोरे यांच्याकडून देण्यात आलेल्या बैठकीस तालुक्याचे ज्येष्ठ काँग्रेस नेते प्रकाश पाटील यांची यांचे प्रमुख उपस्थिती होती

ती बैठक पंढरपूर शहरातील सुरा परिचारक पतसंस्थेत मोठ्या थाटात पार पडली व पंढरपूर विधानसभा मतदारसंघ मागील काळात काँग्रेसकडे होता हा मतदारसंघ पुन्हा काँग्रेसच्या वाट्याला मिळावा अशी मागणी अल्पसंख्यांक सेलचे शहराध्यक्ष अशपाक सय्यद तसेच काँग्रेसचे नेते तानाजी रणदिवे यांनी केली यावर बैठकीत मोठी चर्चा झाली अखेर याबाबत ठराव एक मुखी करण्यात आला.काँग्रेसचे संघटनेत संघटनात्मक २२ इतर विषयावरही या बैठकीत चर्चा करण्यात आली पंढरपूर विधानसभा मतदारसंघाबाबत हा ठराव काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशील कुमार शिंदे खासदार पणती शिंदे व डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील तसेच प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे पाठवण्यात येणार असल्याची माहिती तालुकाध्यक्ष हनुमान मोरे यांच्याकडून देण्यात आले

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले देशाचे माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे खासदार प्रणिती शिंदे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष डॉक्टर धवन सिंह मोहिते पाटील कार्याध्यक्ष अँड नंदकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे व फलटण सेलचे आढावा बैठक काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाश पाटील यांच्या उपस्थितीमध्ये तर पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हनुमान मोरे यांच्या

या बैठकीला ओबीसीचे माजी जिल्हाध्यक्ष समीर कोळी अल्पसंख्यांक श्रीहराध्यक्ष माथाडी कामगार सेल्फी जिल्हाध्यक्ष अशोक पाटोळे ग्राहक संरक्षण जिल्हाध्यक्ष संग्राम जाधव किसान शेती तालुकाध्यक्ष शेळके जिल्हा सरचिटणीस रामकृष्ण जवळेकर तानाजी रणदिवे मल्हारी फाळके प्रकाश साठे नामदेव साळुंखे पंढरपूर मंगळवेढा युवक काँग्रेस विधानसभा अध्यक्ष बलदेव चिखलकर मालवाहतूक संघटन जिल्हाध्यक्ष तात्या फडतरी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा सोशल मीडिया अध्यक्ष बाळासाहेब आजबे समाजसेवक शिवाजी धोत्रे मिलिंद आडगाव आडवळकर पंढरपूर शहर उपाध्यक्ष मनोज गांधरे दिलीप बोरके संजय थिटे अशोक अवताडे पिंटू आडगळी दत्तात्रय शेरखाने हनुमंत नाईक नवरे भैया जमदाडे समाधान गायकवाड राहुल आडगळे तसेच काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते

# कर्नाळ परिसरात बिबट्याचा वावर

सांगली : सांगलीपासून आठ किलोमीटर अंतरावर कर्नाळ-नांद्रे परिसरात बिबट्याचा वावर आढळून आला असून वन विभागाने खात्री करुन लोकांना सावध राहण्याचा सल्ला दिला आहे. नावरस वाडी मधील पोलीस पाटील यांनी शनिवारी रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास वन विभागाला फोन करून बिबट पाहिल्याचे कळवले.कर्नाळ नांद्रे रस्त्यावरील नवीन झालेल्या पुलाच्या जवळ दोन महिलांनी बिबट पाहिला आहे. माहिती मिळताच वन विभाग चे कर्मचारी व वनपाल तुषार भोरे हे जागेवर पोचले. जागेची पाहणी केली असता बिबट या वन्य प्राण्याच्या पाऊल खुणा दिसून आल्या. या परिसरात फिरती करताना बिबट्याचे दर्शन वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना झाले. ३ ते ४ वर्ष वयाचा बिबट समक्ष पाहिल्याचे वन विभागाने पोलीस पाटील व इतरांना सांगितले .


